६ पुढारी शहर/जिल्हा सिंधुदुग, रविवार, ११ डिसेंबर २०२२

# पूर्णब्रह्म स्पर्धेत हळबे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा

कुडाळ येथील पाटकर वर्दे हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात आयोजित पूर्णब्रह्म स्पर्धेत हळबे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सलग तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत सिंधुदुर्गातील १५ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मास्टर शेफ, शेक इट टू मेक इट, टॉवेल आर्ट, मास्टर माईंड, नॅपकिन फोल्ड अशा कला सादर केल्या. हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी पांडुरंग सावंत याला शेक इट टू मेक इट मध्ये द्वितीय क्रमांक, अनिल पाटयेकर व पंकज कांबळे यांना कॅरम स्पर्धेत द्वितीय व राखी हळदणकर हिला बेक माय डे मध्ये तृतीय क्रमांक मिळाला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अभिजीत हेगशेटये, सर्व सदस्य, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य, प्राध्यापकवर्ग